प्रकरण ४ थे

# अभ्यासक्षेत्र

# अभ्यास क्षेत्र

**प्रस्तावना**

भारत हा प्रामुख्याने खेड्यांचा देश आहे. देशात आजही बहुसंख्य जनता ग्रामीण भागात रहात असून शेतीवर उपजीविका करते. दारिद्र्य व अज्ञान यांच्या दुष्टचक्रात अडकलेली जनता अनेक आरोग्यविषयक प्रश्नांनी त्रासलेली असून सुमारे ९० टक्के रोग हे दूषित पाणी व अस्वच्छता यामुळे उद्‌भवत आहेत. जवळजवळ ७५ कोटी ग्रामीण लोकांना पुरेसा औषध उपचार व आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देणे ही केवळ अशक्यप्राय गोष्ट आहे. दवाखाने व औषधे हा या समस्येवरील उपाय नसून लोकांना उघड्यावर शौचास बसण्यापासून परावृत्त करणे, सांडपाणी व घनकचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे हे खरे उपाय आहेत. याची जाणीव भारत सरकारला १९८१ रोजी प्रकर्षाने झाली. याची दोन प्रमुख कारणे होती. एक म्हणजे १९८१ च्या जनगणनेने हे सिध्द केले की, देशातील केवळ १ टक्के लोकांनाच शौचालयाची सुविधा उपलब्ध आहे. आणि दुसरे म्हणजे १९८१ ते १९९० हे दशक संयुक्त राष्ट्रसंघाने पाणी व स्वच्छता दशक म्हणून जाहीर केले. जागतिक पातळीवर संयुक्त राष्ट्रसंघ विकास निधी आणि जागतिक बँक यांच्या संयुक्त सहकार्यातून स्वच्छताविषयक स्वस्त तंत्रज्ञान शोधून काढण्यासाठी तांत्रिक समितीची स्थापना करण्यात आली.

भारतामध्ये प्राचीन काळापासूनच उघड्यावरच शौचास बसण्याची लोकांची सवय आहे. शहरी भागातील लोकांना सुरूवातीला पाटीचे संडास वगळता शौचालय ही गोष्ट लोकांसाठी अनावश्यक व खर्चिक बाब म्हणून राहिली आहे. त्यानंतर त्यात बदल होत जावून भांडे बसवून अथवा कमोडचे संडास बांधले गेले.

भारताच्या पाचव्या पंचवार्षिक योजनेअखेरपर्यंत ग्रामीण स्वच्छतागृहे व शौचालये बांधणी या गोष्टी शासनाच्या दृष्टीने अत्यंत दुर्लक्षित होत्या. प्रथमच सहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये शौचालय बांधणे व सांडपाण्याची विल्हेवाट या गोष्टींना पंचवार्षिक योजनेत स्थान मिळाले व खर्चासाठी मान्यता देण्यात आली. परंतु सातव्या पंचवार्षिक योजनेअखेर पर्यंत या कार्यक्रमाची वाटचाल अत्यंत संथ गतीने चालू होती. लोकांची मनोवृत्ती कायम ठेवून पैसा पुरविल्याने या गोष्टी

साध्य होणार नाहीत ही गोष्ट शासनाच्या ध्यानात १९९० च्या सुमारास आली आणि माहिती, प्रबोधन व संवादास ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमात प्रमुख स्थान देण्यात आले. १९८५ पासून १९९० पर्यंत केवळ ४,५०,८८८ शौचालये भारतभर बांधण्यात आली. तर १९९० ते १९९७ अखेरपर्यंत हीच संख्या ४३,३७,६०९ पर्यंत वाढलेली दिसते. यासाठी जवळजवळ बारा वर्षे लागलेली दिसतात. नवव्या पंचवार्षिक योजनेत मात्र यामध्ये दुपटीने वाढ झालेली दिसते. याचे प्रमुख कारण म्हणजे केवळ अनुदान देण्याऐवजी या काळात प्रबोधनावर भर देण्यात आला. १९९९ मध्ये संपूर्ण स्वच्छता अभियान सुरू करण्यात आले. माहिती, शिक्षण व संवाद या गोष्टींना या अभियानात प्रमुख स्थान देण्यात आले होते व सुमारे ३० टक्के इतका खर्च केवळ माहिती, शिक्षण व संवादासाठी राखून ठेवण्यात आला. लोक सहभाग, तांत्रिक मार्गदर्शन व स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य ही संपूर्ण स्वच्छता अभियानाची प्रमुख वैशिष्ट्ये होती. लोकांशी स्वच्छतेविषयी संवाद साधा, त्यांना आवश्यक ती माहिती व तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण द्या, म्हणजे लोक स्वतःहूनच शौचालये बांधतील. हे या अभियानातील सूत्र होते. म्हणूनच अभियानानंतरच्या केवळ तीनच वर्षात शौचालयांची संख्या दहा लाखावरून ९४५०१४४ वर पोहोचली.

**सारणी क्र. ४.१. : सांगली जिल्ह्यातील स्वच्छता कार्यक्रमाची भौतिक प्रगती (१९८५-१९९६)**

| वर्ष | शौचालये | एकूण शौचालये | शौचालय असणारी कुटुंबे % |
|---|---|---|---|
| १९८५-८६ | १२८ | १२८ | ०.०४ |
| १९८६-८७ | १४९ | २७७ | ०.०९ |
| १९८७-८८ | ४०० | ६७७ | ०.२५ |
| १९८८-८९ | ४०० | १०७७ | ०.३३ |
| १९८९-९० | ४२८ | १५०५ | ०.४७ |
| १९९०-९१ | ३०१ | १८०६ | ०.५६ |
| १९९१-९२ | ७६ | १८८२ | ०.६५ |
| १९९२-९३ | ७८१ | २६६३ | ०.८२ |
| १९९३-९४ | १९२ | २८५५ | ०.८८ |
| १९९४-९५ | ५९७ | ३४५२ | १.०७ |
| १९९५-९६ | १८८८ | ४२७० | १.३२ |

*संदर्भ - ग्रामपंचायत विभाग, अहवाल जिल्हा परिषद सांगली.*

**सारणी क्रमांक ४.२. :** सांगली जिल्ह्यातील केंद्रीय ग्रामीण स्वच्छता (CRSP) काळातील शौचालय बांधणी १९९६-२००० बांधलेल्या शौचालयांची संख्या.

| वर्ष | बांधलेल्या शौचालयांची संख्या |
|---|---|
| १९९६-९७ | ९०४९ |
| १९९७-९८ | १५०३१ |
| १९९८-९९ | १८८१४ |
| १९९९-२००० | १७८१७ |
| **एकूण** | **६०,७११** |

*संदर्भ – सांख्यिकी विभाग जिल्हा परिषद सांगली.*

**सारणी क्रमांक ४.३ :** सांगली जिल्ह्यातील संपूर्ण स्वच्छता अभियान काळातील शौचालय बांधणी

| वर्ष | वैयक्तिक | सार्वजनिक | शाळा |
|---|---|---|---|
| २००१-०२ | ० | ० | ५५ |
| २००२-०३ | ६३२९ | ३७ | ४६८ |
| २००३-०४ | १७५८१ | १४ | २८ |
| २००४-०५ | १८१४५ | १३ | १३६ |
| २००५-०६ | २८४५१ | ९० | २२४ |
| २००६-०७ | २०१३१ | १९ | ११८ |
| **एकूण** | **९०६३७** | **१७३** | **१०२१** |

*संदर्भ – जिल्हा प्रगती अहवाल २००१-०७ जि. प. सांगली.*

भारत सरकारने सुरू केलेल्या संपूर्ण स्वच्छता कार्यक्रमात महाराष्ट्राने अत्यंत हिरीरीने भाग घेतलेला दिसतो. हे अभियान १९९९ मध्ये देशातील केवळ ३१ जिल्ह्यात सुरू करण्यात आले. आजमितीस देशातील ५५९ जिल्हे यात सामील आहेत. महाराष्ट्रामध्ये १९९९ मध्ये केवळ चारच जिल्ह्यात संपूर्ण स्वच्छता अभियान सुरू करण्यात आले. तर आजमितीस सर्वच्या सर्व म्हणजे ३३ जिल्हे या अभियानात सामील झाले आहेत.

**४.१. सांगली जिल्हा :** सांगली जिल्हा हा महाराष्ट्रातील एक अग्रेसर जिल्हा असून या जिल्ह्याला स्वातंत्र्य चळवळीची तसेच सामाजिक चळवळींची एक मोठी परंपरा लाभलेली

आहे. त्यामुळे विकास योजनांचे नियोजन व अंमलबजावणी या क्षेत्रात हा जिल्हा नेहमीच अग्रेसर राहीला आहे.

सन २००१–२००२ मध्ये सांगली जिल्ह्यांत संपूर्ण स्वच्छता अभियानास सुरुवात झाली. अल्पावधीतच या जिल्ह्याने या अभियानात लक्षणीय यश मिळविले आहे. सांगली जिल्ह्यामध्ये शौचालय कामाच्या भौतिक प्रगतीमध्ये असे आढळून आले आहे की, १९८५–८६ मध्ये सांगली जिल्ह्यामध्ये फक्त १२८ (०.०४ टक्के) कुटुंबाकडे शौचालये होती. नंतर १९९६ पर्यंत शौचालयांची संख्या ४२७० इतकी झाली. (सारणी क्र. ४.१) नंतर केंद्रीय ग्रामीण स्वच्छता (CRSP) काळातील १९९६ ते २००० मध्ये बांधलेल्या शौचालयांची संख्या ६०,७११ इतकी झाली. (सारणी क. ४.२) २००१–०२ मध्ये सांगली जिल्ह्यामध्ये संपूर्ण स्वच्छता अभियान राबविले गेले. तेव्हा २००१ ते २००७ पर्यंत वैयक्तिक शौचालयांची संख्या ९०,६३७ इतकी झाली, सार्वजनिक शौचालयांची संख्या १७३ व शाळेसाठी बांधलेल्या शौचालयांची संख्या १,०२१ इतकी झाली. (सारणी क्र. ४.३)

### ४.२. सांगली जिल्हा – दृष्टिक्षेप

स्वातंत्र्यपूर्व काळात१९४७ साली सातारा जिल्ह्याचे विभाजन करण्यात आले. या विभाजनात दक्षिण विभागात जत, औंध आणि बुधगाव या संस्थानांचा समावेश करुन दक्षिण सातारा या जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली. स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर १९६० साली या दक्षिण सातारा जिल्ह्याचे नाव बदलून त्याल सांगली हे नाव देण्यात आले. पश्चिम महाराष्ट्रातील महत्वपूर्ण जिल्हा असणाऱ्या सांगली जिल्ह्याची ओळख सहकारी चळळीचे केंद्रस्थान अशीही आहे. नऊ तालुक्यांचा समावेश असणाऱ्या या जिल्ह्यात सहकारी चळवळीचे जाळे अत्यंत सशक्त असून ग्रामीण व कृषी विकासासोबतच औद्योगिक विकासातही या चळवळीचे लक्षणीय योगदान आहे.

मिरज, जत, कवठेमहांकाळ, खानापूर, तासगाव, आटपाडी, शिराळा, वाळवा आणि पलूस या नऊ तालुक्यांचा सांगली जिल्ह्यामध्ये समावेश होतो. सांगली जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ८६०१.५० वर्ग किलोमीटर असून हे क्षेत्र १६.४५ ते १७.२२ अक्षांश आणि

७३.४२ ते ७५.४० रेखांश या दरम्यान व्यापलेले आहे. सर्व साधारण तापमान असणाऱ्या सांगली जिल्ह्यात किमान तापमान १५.७०इतके असून कमाल तापमान ३७.७० इतके आहे. जिल्ह्यातील पावसाची सरासरी ५८० मी. मी. इतकी आहे. सांगली जिल्ह्यात ०८ शहरांसह ७२७ खेड्यांचा समावेश असून ०१ महानगरपालिका, ०४ नगरपालिका आणि ७०५ ग्रामपंचायत मार्फत स्थानिक प्रशासन चालविले जाते. सांगली जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २००१ च्या जनगणनेनुसार २५,८२,००० असून यापैकी १३,१८,००० (५१.८%) पुरुष तर १२,६३,००० (४८.९२%) महिला आहेत. जिल्ह्यातील दर हजारी महिलांचे प्रमाण ९५७ इतके आहे. जिल्ह्यातील प्रतीवर्ग किलोमीटर लोकसंख्येची घनता ३०१ एवढी आहे. गेल्या काही वर्षातील विशेष प्रयत्नांमुळे साक्षरतेचे प्रमाण वाढले असून जिल्ह्यातील सध्याचे साक्षरतेचे प्रमाण ७६.७०% इतके आहे.

सांगली जिल्ह्यातील या शेतीयोग्य क्षेत्रात ऊस, कापूस अणि तंबाखू ही नगदी पिके गहू, ज्वारी, तांदूळ आणि बाजरी ही धान्य पिके तूर, मूग आणि हरभरा ही कडधान्ये यासह शेंगदाणा, जवस आणि करडी यांसारख्या तेलबियांचे पीकही घेतले जाते. सांगली जिल्ह्यातील नगदी पिकांमध्ये द्राक्षाच्या उत्पादनाचेही लक्षणीय स्थान आहे. जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये शेतीसाठी मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध आहे. तथापि, जिल्ह्यातील काही तालुक्यांचा समावेश दुष्काळी भागांमध्ये होतो. सांगली जिल्ह्यातील कृषी व्यवसायिकांनी शेतीला जोडधंदा म्हणून पशुसंगोपनाला महत्वाचे स्थान दिलेले दिसून येते. या जिल्ह्यात गाई, म्हशी, शेळ्या आणि मेंढ्या हे पशुधन मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. जिल्ह्यातील मोठ्या शेतकऱ्यांसोबत अल्प आणि अत्यल्प भूधारकांना पशुधन संवर्धनाच्या माध्यमातून मोठे उत्पन्न मिळताना आढळते. जिल्ह्यातील सहकारी दूध संस्था आणि मेंढीपालन संस्था यांच्या माध्यमातून या क्षेत्राचा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर विस्तार झाल्याचे दिसून येते.

सांगली जिल्ह्याच्या विकासामध्ये उद्योगक्षेत्राचेही मोठे योगदान आहे. २००४ च्या आकडेवारीनुसार जिल्ह्यात २५१४ छोटे मोठे उद्योग कार्यरत असून त्यातील १५ साखर कारखान्याची भूमिका महत्वाची आहे. साखर उद्योगासोबतच कापड, कातडी, अन्नप्रक्रिया,

रासायनिक, अभियांत्रिकी, इलेक्ट्रानिक्स, इलेक्ट्रीकल उद्योग आणि कृषी मालावरील प्रक्रिया उद्योगांची संख्या लक्षणीय आहे. जिल्ह्यातील द्राक्ष बागायतीला पूरक ठरणारी शीतगृहांची संख्या देखील महत्त्वाची आहे. उद्योगक्षेत्राच्या या विस्तारामुळे निर्माण होणाऱ्या रोजगारातून सांगली जिल्ह्याच्या विकासाला गती प्राप्त झाली आहे. किंबहुना सांगली जिल्ह्याच्या आजच्या संपन्न अशा स्वरूपाच्या निर्मितीत या उद्योगांनी महत्वपूर्ण भूमिका वठवली आहे.

कृषी, उद्योग अणि सहकार क्षेत्रात प्रभावी कामगिरी बजावणाऱ्या सांगली जिल्ह्यात शिक्षण आणि आरोग्य या महत्त्वाच्या सेवाक्षेत्रातही मोठे काम झालेले आहे. सद्या सांगली जिल्ह्यात १७९८ प्राथमिक शाळा, ३४१ माध्यमिक शाळा, ९४ उच्च माध्यमिक शाळा आणि ५२ महाविद्यालयांतून उच्च शिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे. विविध महत्वपूर्ण विद्याशाखांमधील शिक्षण अभ्यासक्रम जिल्हा अंतर्गत महाविद्यालयांतून उपलब्ध आहे. जिल्ह्यातील जनतेचे आरोग्यमान सांभाळण्यासाठी सांगली जिल्ह्यात २२ रुग्णालये, ७० सार्वजनिक दवाखाने आणि ५९ प्राथमिक आरोग्यकेंद्रे कार्यरत आहेत. जिल्ह्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासह सर्वदूर प्रसिद्ध असणारी खाजगी व धर्मादाय रुग्णालये देखील विशेष उपचारांसाठी उपलब्ध आहेत.

एकंदर ०९ तालुके आणि ७२७ गावांचा हा सांगली जिल्हा राज्याच्या नकाशावर महत्त्वाचा जिल्हा आहे. कृषी, सेवा, उद्योग आणि सहकार या क्षेत्रातील आपल्या लक्षणीय कामगिरीमुळे जनतेचे जीवन सुलभ करणारा हा जिल्हा कृष्णा, वारणेसह महत्वपूर्ण नद्यांच्या प्रवाहामुळे निसर्गरम्य झाला आहे. शिक्षणाचे वाढते प्रमाण, शेतकऱ्यांमधील प्रयोगशीलता, माहिती तंत्रज्ञानाचा जाणीवपूर्वक वापर आणि स्वयंपूर्णतेसाठी कष्ट घेण्याची तयारी या सगळ्या गुण वैशिष्ट्यांमुळे सांगली जिल्ह्याला वेगळे परिमाण लाभले आहे. शासनाच्या लोककल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणाऱ्या या जिल्ह्याने ग्रामीण जनतेच्या जीवनात सुलभता आणण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. अलिकडच्या काळातील दुष्काळाने जलसंधारण क्षेत्राच्या विकासासाठी दिलेली प्रेरणा आज जिल्ह्याला या क्षेत्रातही आघाडीवर घेऊन जाण्यासाठी उपयुक्त ठरत आहे. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांचा योग्य समन्वय आणि दोघांच्याही केंद्रस्थानी असणारे आम जनतेचे हीत या जिल्ह्याचे

चित्र इतर जिल्ह्यांपेक्षा वेगळे करण्यासाठी उपयोगी ठरत आहे. वेगवेगळ्या क्षेत्रात लक्षणीय काम करुन सांगली पॅटर्न ही संज्ञा त्या त्या क्षेत्रातील कामाला मिळवून देणारा हा जिल्हा अनेक क्षेत्रात इतरासाठी जसा पथदर्शी आहे तसाच उद्याच्या संपन्नतेची शाश्वती देणारा आहे.

**सारणी ४.४.** : जिल्ह्याची प्रगती दर्शविणारा तक्ता

| दर्शक | भारत | महाराष्ट्र | सांगली जिल्हा |
|---|---|---|---|
| लोकसंख्या २००१ | १०२.७० | ९.६८ | ०.२५८१ |
| लोकसंख्या वाढीचा दर | २१.३४ | २२.५७ | १६.८५ |
| लोकसंख्या घनता | ३२४ | ३१४ | २१९ |
| स्त्रिया दर हजार पुरुषामागे | ९३३ | ९२२ | ९५५ |
| साक्षरता | ६५.३८ | ७७.२७ | ७६.६ |

*संदर्भ- आरोग्य विभागाचा अहवाल, जिल्हा परिषद सांगली २००६.*

सांगली जिल्ह्यातील तीन गावांनी लागोपाठ संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेत राज्यात प्रथम क्रमांक मिळविलेला असून माळवाडी, अंकलखोप, तुंग ही गावे राज्यातील निर्मलग्राम ठरली आहेत. वरील सर्व गोष्टींचा विचार करून सांगली जिल्ह्याची निवड प्रस्तूत संशोधनासाठी करण्यात आली.

सांगली जिल्ह्यामध्ये मानवेंद्रनाथ रॉय अनौपचरिक शिक्षण व संशोधन संस्था व जिल्हा परिषद यांच्या संयुक्त प्रयत्नातून अत्यंत नियोजनबद्ध रीतीने माहिती, शिक्षण व संवाद (IEC) कार्यक्रम राबविण्यात आला. त्यामुळे या कार्यकम्राची देशभर प्रशंसा झाली. परंतु जिल्ह्यातील काही गावांनी संपूर्ण स्वच्छता अभियानात प्रचंड सहभाग दिला असला तरीही काही गावे मात्र या बाबतीत अत्यंत उदासीन राहिली आहे. त्यांच्या उदासीनतेची कारणे शोधणे व योग्य ते उपाय करणे अत्यंत आवश्यक असल्याने संपूर्ण स्वच्छता अभियानात स्पृहणीय कार्य केलेले एक गाव व अभियानाबाबत उदासीन असणारे एक गाव यांचा तुलनात्मक अभ्यास झाल्यास विकास कार्यक्रमाबाबत 'माहिती, शिक्षण व संवाद' कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमुळे लोकांच्या मनोवृत्तीत बदल होऊन ते नव्या गोष्टी करतात. करण्यास प्रवृत्त होतात ही गोष्ट संयुक्त राष्ट्रसंघाची अन्न व शेती संघटना, जागतिक आरोग्य

संघटना, युनिसेफ यांच्या अभ्यासातून पुरेसे स्पष्ट झाले असल्याने 'माहिती, शिक्षण व संवाद' कार्यक्रमाची संपूर्ण स्वच्छता अभियानात प्रमुख भूमिका असते असे गृहीतक मांडून पलूस तालुक्यातील अंकलखोप व मिरज तालुक्यातील कावजी खोतवाडी अशा दोन गावांची निवड अभ्यासासाठी करण्यात आली. या निवडीसाठी संपूर्ण स्वच्छता अभियानाअंतर्गत संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानातील मूल्यमापन अहवालाचा वापर करण्यात आला. अंकलखोप या गावाने राज्यपातळीवरील प्रथम क्रमांक मिळविला असून कावजी खोतवाडी या गावास मात्र ३०% पेक्षाही कमी गुण प्राप्त झाले आहेत असे आढळले. त्यामुळे सांगली जिल्ह्यातील संपूर्ण स्वच्छता अभियानाबाबतीत अत्यंत उदासीन असणाऱ्या गावांपैकी कावजी खोतवाडी हे गाव आहे.

### ४.३. अंकलखोप गावाची माहिती

अंकलखोप हे सांगली जिल्ह्यातील पलूस तालुक्यातील एक प्रगत गाव आहे. १९९९ सालापर्यंत हे गाव श्रीमंत पण गलिच्छ म्हणून प्रसिद्ध होते. जागोजागी साठलेली पाण्याची डबकी, घराभोवती असणारे कचऱ्याचे ढीग, उघडे उकिरडे यामुळे गावाला एक प्रकारचा बकालपणा आलेला होता. कोणत्याही रस्त्याने गावात प्रवेश केला तरी रस्त्याच्या कडेला उघड्यावर शौचास बसणाऱ्या लोकांनी केलेल्या घाणीमुळे जीव नकोसा होत असे. केंद्र पुरस्कृत ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमातंर्गत अनुदान उपलब्ध असले तरी शौचालयांचे महत्त्व न पटल्याने लोकांनी वैयक्तिक शौचालये फारशा प्रमाणात बांधली नव्हती. घनकचरा व सांडपाणी निर्गतीचे तंत्रज्ञान माहिती नसल्याने गाव अस्वच्छ होते. १९९९ मध्ये सुरू झालेल्या संपूर्ण स्वच्छता अभियानामध्ये व महाराष्ट्र शासनाच्या संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानामध्ये गावाने भाग घ्यायचा ठरविला. गावातील कर्तबगार ग्रामसेवक श्री. धनवडे, सरपंच व गावातील सामाजिक कार्यकर्ते यांनी जिल्हा परिषदेकडून माहिती व प्रशिक्षण प्राप्त केले आणि अत्यंत शास्त्रीय पद्धतीने व मन:पूर्वक माहिती, शिक्षण व संवाद कार्यक्रम गावात राबवला. अनेक प्रकारची प्रशिक्षणे, प्रात्यक्षिके आयोजित करण्यात आली. महिला, युवक, बचतगट, शालेय विद्यार्थी यांच्या वारंवार बैठका व प्रशिक्षणे घेवून स्वच्छता कार्यक्रमास

लोकचळवळीचे स्वरूप दिले. पूर्वी गावात वर्षातून दोन ग्रामसभा सुध्दा होत नव्हत्या. तेथे महिन्यातून दोन ग्रामसभा सुरू झाल्या. सरकारी कर्मचारी, लोकप्रतिनिधी, मानवेंद्रनाथ रॉय अनौपचारिक शिक्षणसंस्थेचे प्रतिनिधी व कार्यकर्ते यांच्या प्रयत्नातून गावाने जिल्हा, विभागीय व राज्यपातळीवर प्रथम पारितोषिके पटकावली व गावाला आदर्श स्वरूप प्राप्त करून दिले.

अंकलखोप या गावाचे भौगोलिक क्षेत्र १९०२ हेक्टर असून गावाची एकूण लोकसंख्या सुमारे १०६६० इतकी आहे. त्यापैकी पुरूषांची संख्या ५४५० असून स्त्रियांची संख्या ५२१० इतकी आहे. गावातील एकूण कुटुंब संख्या १९१९ असून त्यापैकी ५५३ कुटुंबे दारिद्र्य रेषेखाली आहेत. तर १५५७ कुटुंबे दारिद्र्य रेषेवरील आहेत. गावातील बागायती क्षेत्र १७७७ हेक्टर असून जिरायत क्षेत्र केवळ १०१ हेक्टर इतके आहे. गावातील मुख्य व्यवसाय शेती असून ऊस, सोयाबीन, भुईमूग, ज्वारी, बाजरी इ. प्रमुख पिके आहेत. गावामध्ये शिकण्याची अत्यंत उत्तम सोय असून १० अंगणवाड्या, २ प्राथमिक शाळा, २ माध्यमिक शाळा व सहा भागशाळा आहेत. गावात प्राथमिक आरोग्य केंद्र असून १२ खाजगी दवाखाने आहेत. अंकलखोप येथे सहा बँका असून १८ पतसंस्था आहेत. गावाचे साक्षरता प्रमाण ८५% इतके आहे. गावाची संघटन प्रवृत्ती असून गावात २० तरूण मंडळ व ७ महिला मंडळे आहेत. स्वच्छता ९४ बचतगट, ७ डेअऱ्या, २ विविध कार्यकारी सहकारी संस्था आहेत. घनकचरा निर्मूलन व सांडपाणी व्यवस्था याबाबतीत गावाने प्रचंड प्रगती केली असून गावात १००% गटारी, १११ सार्वजनिक शौचालये, १५०० वैयक्तिक शौचालये असून ३५० बायोगॅस व २०० गांडूळ खत प्रकल्प आहेत. गावामध्ये दोन सार्वजनिक गांडूळ खत प्रकल्प आहेत. याशिवाय १५ नेडॅप कंपोस्ट आहेत. तसेच ७५२ निर्धूर चुली आहेत. या गावाने घनकचरा व सांडपाणी यांच्या विल्हेवाटीसाठी काही अत्यंत अभिनव उपक्रम राबविलेले आहेत. सांगली जिल्ह्यातील पहिला युरिया रिकव्हरी प्लँट सार्वजनिक मुतारीवर बसवण्यात आला आहे. सार्वजनिक शौचालयातील मैल्यावर प्रक्रिया करण्यासाठी प्रकल्प उभा करण्यात आला आहे. ग्रामपंचायतीच्या समोरील चौकातील डांबरीकरण कचऱ्यातील कॅरीबॅग्ज वापरून विशेष टिकाऊ बनवण्यात आले आहे. प्लॅस्टिक कॅरीबॅगचा वापर टाळण्यासाठी जुन्या

पॉलीस्टर साड्यामधून टिकाऊ पिशव्या तयार करण्यात आल्या आहेत. हे सर्व तंत्रज्ञान एम. एन. रॉय संस्थेचे डॉ. राजेंद्र कुंभार यांनी उपलब्ध करून दिले व या उपक्रमांचा श्रीलंका व बांग्लादेशमधून आलेल्या जागतिक बँकेच्या प्रतिनिधींनी विशेष गौरव केला. अशाप्रकारे अंकलखोप गाव हे महाराष्ट्र राज्यात संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान स्पर्धेत पहिला क्रमांक मिळवून संपूर्ण स्वच्छता अभियानात १००% यशस्वी झाले आहे.

**४.४. कावजी खोतवाडी**

कावजी खोतवाडी हे सांगली जिल्ह्यातील आडबाजूला पडलेले अत्यंत मागासलेले गाव आहे. एखादे गाव संपत्तीच्या दृष्टीने समृद्ध असले तरी ज्ञानाच्या व शिक्षणाच्या अभावी त्याची अवस्था किती वाईट होवू शकते याचे उदाहरण म्हणजे कावजी खोतवाडी. गाव संपूर्ण बागायत आहे. परंतु साक्षरतेचे प्रमाण केवळ ३० टक्के आहे. शहरापासून दूर असल्याने व राजकीय जागृती कमी असल्याने या गावाला सुधारणांचा वारा लागलेला दिसत नाही. गावाला पूर्ण वेळ दवाखाना नाही. माध्यमिक शाळा नाही. उद्योग व्यवसाय नाहीत. त्यामुळे सामाजिक व राजकीय अभिसरण होत नाही. आडबाजूला असल्याने सरकारी अधिकारी गावाकडे फिरकत नाहीत. जिल्हाभर संपूर्ण स्वच्छता अभियानाचे वारे वाहत असतानाही हे गाव मात्र या साऱ्यापासून अलिप्तच राहिले. निरक्षरतेमुळे वृत्तपत्रे, पत्रके, शासनादेश व पोस्टर यांचा प्रबोधनासाठी काहीच उपयोग होत नाही. माहिती, शिक्षण व संवादाचे कोणतेही कार्यक्रम गावात राबवण्यात आलेले नाहीत. उघडी गटारे, उघडे उकिरडे रस्त्यांच्या कडेला विष्ठेमुळे निर्माण झालेली घाण, साध्या चुलीमुळे धुरकटलेली घरे व गांजलेले गावकरी अशी या गावाची स्थिती आहे. गावाची एकूण लोकसंख्या सुमारे ३१४८ इतकी आहे. एकूण कुटुंब संख्या ५३५ इतकी आहे. त्यापैकी दारिद्र्य रेषेखालील कुटुंबसंख्या १५३ आहे. गावातील बागायती क्षेत्र ४०० हेक्टर तर जिरायती क्षेत्र २०० हेक्टर आहे. गावातील मुख्य व्यवसाय शेती आहे. गावात एक प्राथमिक शाळा आहे तर हायस्कूलसाठी मुले नांद्रा, बिसूर, माधवनगरला जातात. तेथे एक प्राथमिक आरोग्य उपकेंद्र आहे. तेथे ३ तरुण मंडळे, १ सोसायटी तसेच ४


बचतगट व २ महिला मंडळे आहेत. वैयक्तिक शौचालये २२% असून सार्वजनिक शौचालये गावात नाहीत. गांडूळ खत प्रकल्पांची संख्या २ आहे तर निर्धूर चुली गावात ८% आढळल्या.

७८% लोक शौचालयासाठी उघड्यावरच जातात. तसेच गावामध्ये बांधीव गटारी आढळल्या नाहीत. तसेच सांडपाण्याची काहीच व्यवस्था आढळून आली नाही. कचऱ्याचे देखील अस्ताव्यस्त ढिगारे दिसून आले. गावामध्ये कच्चे रस्ते आहेत. रस्त्यावरच काही ठिकाणी पाणी सोडून दिलेले आढळले. या गावामध्ये माहिती, शिक्षण व प्रशिक्षण यांचे कोणतेही कार्यक्रम घेतलेले नाहीत. त्यामुळे गावामध्ये शौचालय, गांडूळखत व निर्धूर चूल यांच्याविषयी अज्ञान, अंधश्रद्धा व गैरसमज आढळून आले. अशा प्रकारे कावजी खोतवाडी हे गाव सांगली जिल्ह्यातील अतिशय असुधारित असे घाणेरडे गाव समजले जाते.

**सारणी ४.५. – अंकलखोप व कावजी खोतवाडी गावांची सर्वसाधारण माहिती**

| सर्वसाधारण माहिती | अंकलखोप | कावजी खोतवाडी |
|---|---|---|
| एकूण लोकसंख्या | १०६६० | ३१४८ |
| पुरुषांची लोकसंख्या | ५४५० | १६०८ |
| स्त्रियांची संख्या | ५२१० | १५४० |
| एकूण कुटुंबसंख्या | १९१९ | ५३५ |
| दारिद्र्य रेषेखालील कुटुंबसंख्या | ५५३ | १५३ |
| भूमिहीन शेतमजुरांची संख्या | ७०० | २०० |
| बागायती क्षेत्र हेक्टर | १७७७ | ४०० |
| जिरायती क्षेत्र हेक्टर | १०१ | २०० |
| मुख्य व्यवसाय | शेती | शेती |
| गुरांची संख्या | ६१६० | १९७० |
| कूपनलिका | ७ | नाहीत |
| अंगणवाडी | १० | २ |
| प्राथमिक शाळा | २ | १ |
| हायस्कूल | २ | नाही |
| भागशाळा | ६ | – |
| खाजगी दवाखाना | १२ | १ |
| प्राथमिक आरोग्य केंद्र | १ | उपकेंद्र |
| बँका | ६ | नाहीत |
| पतसंस्था | १८ | १ |
| सोसायटी | २ | १ |
| तरुण मंडळे | २० | ३ |

| | | |
|---|---|---|
| महिला मंडळे | ७ | १ |
| बचत गट | ९४ | ४ |
| डेअऱ्या | ७ | २ |
| साक्षरता प्रमाण | ८५% | ३०% |
| वैयक्तिक शौचालये | १५०० (६९%) | १२२ (२२%) |
| सार्वजनिक शौचालये | १११ युनिट (३०.२३) | नाहीत ० |
| उघड्यावर शौचास जाणारी कुटुंबे | ० | ४१३ (७८%) |
| बायोगॅस संख्या | १५० | २ |
| वै. गांडूळखत प्रकल्प | २०० (१३%) | २ (०.३७%) |
| नेडॅप कंपोस्ट | १५ | – |
| सार्वजनिक गांडूळखत प्रकल्प | २ | नाहीत |
| निर्धूर चुलींची संख्या | ७५२ (३५%) | ८% (४३) |


District Map of MAHARASHTRA
महाराष्ट्र
MADHYA PRADESH
GUJARAT
NANDURBAR
DHULE
JALGAON
AMRAVATI
NAGPUR
BHANDARA
GONDIA
AKOLA
BULDHANA
WARDHA
NASHIK
AURANGABAD
WASHIM
YAVATMAL
CHANDRAPUR
THANE
JALNA
HINGOLI
GADCHIROLI
AHMADNAGAR
PARBHANI
MUMBAI (BOMBAY) State Headquarter
BID
NANDED
RAIGARH
PUNE
LATUR
OSMANABAD
ARABIAN SEA
SATARA
SOLAPUR
RATNAGIRI
SANGLI
ANDHRA PRADESH
KOLHAPUR
KARNATAKA
SINDHUDURG
Map not to Scale
Copyright © 2006 Compare Infobase Limited
State Capital
State Boundary
District Boundary
Maharashtra State
सांगली
Sangli District
पलुस
मिरज

## सांगली जिल्ह्यातील संपूर्ण अभियानाची संस्थात्मक रचना

